स.के.नं. १४३/२२

नि.क्र. १०/क लगत...

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - दिनकर बाळू गावंड

वय - ६५ वर्षे

व्यवसाय - सेवानिवृत्त

राहणार - दिघाटी, ता. पनवेल, जि. रायगड

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...</u>**

१. मला एकूण दोन मुले व तीन मुली आहेत. साक्षीदार अनिकेत हा माझा सर्वात लहान मुलगा आहे. अनिकेत सन २०२० मध्ये कामाला होता. दिनांक २९.०९.२०२० रोजी अनिकेतचा अपघात झाला म्हणून मला फोन आला होता. सदर दिवशी रात्री तो बाईकवरून मावशीकडे गेला होता. आमच्या गावातील जयेश व सुशांत यांनी घटनेची माहिती आम्हाला दिली. अपघात हा सारडा येथे झाला होता. घटनास्थळी अनिकेत व मोटारसायकल पडलेली होती. मोटारसायकल खराब अवस्थेत पडलेली होती. सफेद रंगाच्या चारचाकी वाहनाने माझे मुलाच्या मोटारसायकलला ठोकले होते. चारचाकी वाहन घटनास्थळी होते. मी अनिकेतला पनवेल येथील दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी त्याला घेतले नसल्याने मी त्याला अपोलो दवाखान्यात नेले. अनिकेतला जास्त मार लागल्याने पनवेलच्या डॉक्टरांनी दाखल करून घेतले नाही. अनिकेत दवाखान्यात असताना बेशुध्द होता. दिनांक ०१.१०.२०२० रोजी मी उरण पोलीस ठाण्यात घटनेची रितसर फिर्याद दिली. आता

मला फिर्याद दाखवली, ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. **फिर्याद नि.क्र. १३** वर आहे. दिनांक ०२.१०.२०२० रोजी पोलीसांनी मला परत पंचनाम्यासाठी बोलावले होते. पंचनामा झाल्यावर मी माझे घरी गेलो. मी आरोपीला ओळखू शकत नाही.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. धिरज डाकी यांच्यामार्फत...**

२. मी सन २०१९ मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. ज्या गाडीने अपघात झाला त्याचा क्रमांक मला सांगता येत नाही. माझा मुलगा मद्यपान करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी घटनेच्या वेळी वर्दळ कमी होती. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा प्रस्तुत गुन्हयाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी घटनेच्या वेळी चारचाकी वाहन चालवत नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – ०३.०९.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

स.के.नं. १४३/२२

नि.क्र. १०/क लगत...

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | अनिकेत दिनकर गावंड |
| वय | - | २७ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| राहणार | - | दिघाटी, ता. उरण, जि. रायगड |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...**

१. दिनांक २९.०९.२०२० रोजी मी रात्रीच्या वेळी पाले या गावात माझे मावशीकडे मोटारसायकल क्र. एम.एच.-४६/सी.सी.-२२९९ वरून जात होतो. आरोपी कल्पेश पाटील हा स्वीफ्ट चारचाकी वाहनातून वेगात उलट दिशेने येउन मला ठोकला. माझे डोक्याला इजा झाली. स्थानिक लोकांनी मला दवाखान्यात उपचारासाठी नेले. अपोलो हॉस्पीटल, बेलापूर येथे माझेवर बरेच दिवस उपचार झाले. पोलीसांनी डिसेंबर २०२० मध्ये माझा बयाण नोंदवला. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर नाही. आता मला अटक फॉर्मवरील फोटो दाखवण्यात आला. तो आरोपीचा फोटो आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. धिरज डाकी यांच्यामार्फत...**

२. अपघाताच्या वेळी मी माझे मित्राकडे फर्निचरच्या दुकानात काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझी मोटारसायकल हेवी वेट आहे. माझे मावशीची

तब्येत बरी नसल्याने मी मावशीकडे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पडल्यामुळे गाडीचा क्रमांक व चालकास मी पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी ढाब्यावर जेवण व मद्यपान करून माझी मोटारसायकल चालवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, कारचा नोंदणी क्रमांक मला इतर लोकांकडून समजला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – ०३.०९.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

स.के.नं. १४३/२२

नि.क्र. १०/क लगत...

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | दिप्ती जयंतीलाल म्हात्रे |
| वय | - | ४२ वर्षे |
| व्यवसाय | - | घरकाम |
| राहणार | - | कोपरखैरणे, नवी मुंबई |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...**

१. मला एकूण दोन बहिणी व दोन भाउ आहेत. अनिकेत हा सर्वात लहान भाउ आहे. सन २०२० मध्ये अनिकेत हा मोटारसायकल चालवत होता. दिनांक २९.०९.२०२० रोजी सकाळी ४.०० वाजता माझे वडीलांचा फोन आला की, अनिकेतचा अपघात झाला आहे. अनिकेत अपोलो दवाखान्यात ॲडमिट असताना माझे वडीलांना मला दवाखान्यात बोलावून घेतले. मी दवाखान्यात गेले त्यावेळी अनिकेतला इमर्जन्सी वॉर्डमध्ये खाली ठेवले होते. मारूती कंपनीच्या चारचाकी वाहनाने माझे भावाचा अपघात केला होता. पोलीसांनी माझा बयाण नोंदवला होता.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. धिरज डाकी यांच्यामार्फत...**

२. कोणत्या गाडीने अपघात झाला व ते कोण चालवत होते हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात प्रत्यक्ष पाहिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा प्रस्तुत गुन्हयाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की,

मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण,

दिनांक – ०३.०९.२०२४

(ल.मु.सय्यद)

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण

स.के.नं. १४३/२२

नि.क्र. १०/क लगत...

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | परमानंद अशोक पाटील |
| वय | - | २९ वर्षे |
| व्यवसाय | - | व्यवसाय |
| राहणार | - | दिघाटी, ता. उरण, जि. रायगड |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती छापेकर यांच्यामार्फत...</u>**

१. सन २०२० मध्ये माझे स्वत:चे कोप्रोली येथे फर्निचरचे दुकान होते. दिनांक २९.०९.२०२० रोजी आमच्या गावातील दोन इसम सुशांत गावंड व जयेश ठाकूर हे उरण येथे नोकरीस होते. त्यांनी मला फोन करून सांगितले की, अनिकेत गावंड याचा सारडे गावाच्या हद्दीत अपघात झाला होता. मी ताबडतोब घटनास्थळी गेलो. घटनास्थळी आरोपीची मोटारसायकल व चारचाकी वाहन स्वीफ्ट होते. गाडीचा नंबर व चालक मी पाहिले नव्हते. ॲम्ब्युलन्स बोलावून आम्ही अनिकेतला दवाखान्यात नेले. तेथून त्याला अपोलो दवाखान्यात नेले. चारचाकी वाहन पांढ-या रंगाचे होते. पोलीसांनी माझा जबाब नोंदवून घेतला होता.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. धिरज डाकी यांच्यामार्फत...</u>**

२. मी दिघाटी येथे राहतो. मला फोन आला त्यावेळी मी माझे घरी होतो. हे म्हणणे खरे नाही की, दिघाटेवरून सारडे गावात मोटारसायकलवरून येण्यासाठी

२० मिनीटे लागतात. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनास्थळी येण्यासाठी अर्धा तास लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, अनिकेत माझा मित्र असल्याने त्याला मदत व्हावी म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा प्रस्तुत गुन्हयाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (ल.मु.सय्यद)

दिनांक – ०३.०९.२०२४ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण